# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 06/2024 दिनांक : 03.01.2024

## 1)जबरी चोरी :-

**नांदेड ग्रामीण** :-दिनांक 31.12.2023 रोजी 23.45 वा. चे सुमारास, **राम मंदीर जवळ संभाजी चौक सिडको, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे घराकडे पायी जात असतांना समोरून मोटार सायकलवर तीन अनोळखी आरोपी आले व एक आरोपी अंधारात उभा होता त्यांनी फिर्यादी जवळ येवून खंजर काढुन खंजरने फिर्यादीचे गळयावर, मांडीवर मारून खिश्यातील नगदी 3500/-रूपये व लावा कंपनिचा मोबाईल किंमती 1000/-रूपयाचा असा एकुण 4500/- रूपयेचा माल जबरीने चोरून नेले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी विक्रम रामा जाधव, वय 45 वर्षे, व्यवसाय चालक रा. पिंपळदरी ता. लोहा जि. नांदेड ह.मु. संभाजी चौक सिडको, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 07/2024 कलम 394,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर,** हे करीत आहेत.

## 2)मो.सा.चोरी :-

**भाग्यनगर** :- दिनांक 01.01.2024 रोजी 18.00 वा. ते 19.30 वा. चे दरम्यान, **चतुर्थी हॉटेल छत्रपती चौक, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्प्लेंडर कंपनीची मोटार सायकल क्रं. एम.एच.-26/सीए-2064 किंमती 35,000/-रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी दत्ता लक्ष्मण डुबुकवाड, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. तेहरानगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 02/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2294 हुंड, मो.क्रं. 7083182294** हे करीत आहेत.

## 3)अवैध रेती चोरी :-

**सोनखेड** :-दिनांक 30.12.2023 रोजी 22.00 वा. चे सुमारास, **दगडगाव टि पाईंट सोनखेड बसस्टॅड ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद 1) हायवा टिपर क्रं एमएच-20/बी-9255 2) 2) हायवा टिपर क्रं एमएच-20/बी-4187 चे चालक व मालक यातील नमुद चार आरोपीतांनी शासनाचे ताब्यातील गौण खनिज वाळु उपसा करून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करीत असतांना हायवाचे चारीही बाजुने रजिस्ट्रेशन नंबर न टाकता व वाहनाचे कागदपत्र न बाळगता त्यांचे वाहन भरधाव वेगाने लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहतूक करीत असताना मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री रवी यादवराव बुरकुले, ने. पोस्टे सोनखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 02/2024 कलम 379,283,34 भादवी सह कलम 130/177, 50/177 मो.वा.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2342 हंबर्डे, मो. क्रं. 9284422052** हे करीत आहेत.

## 4)शासकीय कामात अडथळा :-

**1)किनवट** :- दिनांक 31.12.2023 रोजी 21.00 वा. ते 21.30 वा. चे दरम्यान, **प्राथमिक आरोग्य केंद्र बोधडी बु. ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे पीएचसी बोधडी बु. येथे कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया शिबीर चालू असताना यातील नमुद आरोपीने आरोग्य केद्रात येवून दारूचे नशेत अश्लिल शिवीगाळ करून दवाखान्यात शस्त्रक्रिया झालेल्या महिलांचे फोटो काढण्याचा प्रयत्न करीत असता त्यास अडवण्याचा प्रयत्न करीत असता फिर्यादी व कर्मचारी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून तू बाहेर भेट तुला ठार मारतो अशी धमकी देवून अरेरावी करून शासकीय काम करीत असतांना अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी डॉ. मनोहर पांडुरंग शिंदे, वैद्यकीय अधिकारी, रा. गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे किनवट** गुरनं 02/2024 कलम 353,294,504,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मामीडवार, मो.क्रं. 9309737349** हे करीत आहेत.

**2)देगलूर** :- दिनांक 02.01.2024 रोजी 09.00 वा. चे सुमारास, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे झेंडयाजवळ सार्वजनिक रोडवर क्रांती नगर देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपी एकमेकांत भांडण करत असतांना फिर्यादी त्यांचे भांडण सोडविण्यासाठी गेला असता यातील आरोपीतांनी फिर्यादीच्या युनिफॉर्मच्या शर्टला धरून फिर्यादीला धक्का देवून शासकीय वाहन अडवले व फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/347 शेख अजीम शेख वहीद ने. पोस्टे देगलूर** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे किनवट** गुरनं 10/2024 कलम 353,341,160,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मुंडे, मो.क्रं. 7774840493** हे करीत आहेत.

## 5)अंमली पदार्थ :-

**किनवट** :-दिनांक 02.01.2024 रोजी 14.45 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरी सुभाषनगर किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले राहते घरी गांजा अंमल पदार्थ 6,600 किलो ग्रॅम किंमती 1,32,000/रूपयाचा व नगदी 80,100/-रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री बाबासाहेब पाराजी थोरे, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 01/2024 कलम 20 एनडीपीएस कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री फडेवार, मो.क्रं. 8087745281** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :—

**उमरी :—**दिनांक 03.01.2024 रोजी 01.30 वा. चे सुमारास, **मौजे शिंगणापूर मारूती मंदीर परिसरात ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात लोखंडी खंजर ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2354 रमण फकीरा गेडाम, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 04/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2336 जाधव, मो.क्रं. 9421841380** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :—

**उस्माननगर :—** दिनांक 02.01.2024 रोजी 20.50 वा. चे सुमारास, **उस्माननगर बसस्टॉप ते उदासीन बाबा चौक कडे जाणारे रोडवर स्मशानभुमी पुलाजवळ उस्माननगर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3,360/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने पॅशन मोटार सायकल क्रं. एम.एच.—26/डब्ल्यु—3057 किंमती 20,000/—रूपयाची वर वाहतुक करीत असताना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गजानन विठ्ठलराव गाडेकर, वय 41 वर्षे,. ने. पोस्टे उस्माननगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 01/2024 कलम 65 (ई), 83 म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2499 भारती, मो.नं. 9579854437** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 07/2024 दिनांक : 03.01.2024**

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले"** यांची जयंती साजरी

03 जानेवारी, 2024 बुधवार रोजी **"क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले"** यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी **"क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले"** यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, नांदेड यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **पोहेकॉ/संजय सांगवीकर**, यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

